# अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक,
# महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशासकीय मध्यवर्ती इमारत,
# दक्षिण बाजू, दुसरा मजला, पुणे -४११००१
# सन २०१३.

महाराष्ट्र शासनाच्या कारागृह विभागाचे अधिनस्त विविध कार्यालयातील अराजपत्रित गट क, मधील रिक्त पदे भरण्यासाठी रिक्त पदांचा आढावा घेऊन खालील नमूद संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (online) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. रिक्त पदांचा तपशिल शैक्षणिक अर्हता, विहीत केलेली वेतनश्रेणी, सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, नियुक्तीच्या अटी व शर्ती ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सूचना महाराष्ट्र कारागृह विभागाच्या **www.mahaprisons.gov.in** या संकेतस्थळावर व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेच्या **http://oasis.mkcl.org/dig** संकेतस्थळावर **दिनांक ०६/०१/२०१४ पासून ते दिनांक ३१/०१/२०१४ पर्यंत उपलब्ध आहेत.**

| अ.क्र | पदाचे नाव | पदाची वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | कारागृह शिपाई | ५२००- २०२०० ग्रेड वेतन २०००/- विशेष वेतन रु.५००/- | किमान उच्च माध्यमिक परिक्षा ( इयत्ता १२ वी) अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | ---- |

➤ **शारिरिक पात्रता कारागृह शिपाई पदासाठी :-**

| | महिला | पुरुष |
|---|---|---|
| उंची | १५५ सें.मी.पेक्षा कमी नसावी | १६५ सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| छाती | --------- | न फुगवता ७९ से मी पेक्षा कमी नसावी व फुगवून ८४ से मी पेक्षा कमी नसावी. (न फुगविलेली छाती व फुगविलेली छाती यातील फरक ५ से मी पेक्षा कमी नसावा.) |

**शारिरीक पात्रतेतील सुट :-**

१. **खेळाडू प्रवर्ग** :- आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष व महिला खेळाडुंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ से मी. इतकी सुट देय राहिल.

२. **अनुकंपा तत्वावरील भरती** :- कारागृह विभागातील बेपत्ता कर्मचारी किंवा असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणामुळे वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे किंवा जे सेवेत असताना मृत पावले आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच मुलास किंवा मुलीस कारागृह शिपाई या पदाच्या भरतीसाठी खालीलप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल राहिल.

**अ)** उंची :- २.५ से मी महिला व पुरुष उमेदवारासाठी

**ब)** छाती :- २ से मी न फुगविता व १.५ से मी फुगवुन पुरुष उमेदवारासाठी.

**वैद्यकिय तपासणी :-** उमेदवारांची वैद्यकिय तपासणी प्राधिकृत शासकिय वैद्यकिय अधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकिय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रातआंधळेपणा, वर्णांधतेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे , सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग व कारागृह महानिरीक्षकांनी वेळोवेळी विहित केलेल्या वैद्यकिय चाचण्यांचा समावेश असेल.

## १. कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांचे अधिनस्त कारागृहांकरिता

**मध्यवर्ती कारागृहः-** मुंबई, ठाणे, तळोजा

**जिल्हा कारागृह :-** भायखळा, कल्याण, अलिबाग, सावंतवाडी, मुंबई महिला, जे जे समूह रुग्णालय कारागृह.

**विशेष कारागृहः-** रत्नागिरी.

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व-साधारण | माजी सैनीक १५% | प्रकल्प-ग्रस्त ५% | भुकंप-ग्रस्त २% | खेळाडू ५% | महिला ३०% | अंश-कालीन १०% | होमगार्ड ५% |
| १. | अनु. जाती | २६ | ५ | ४ | २ | १ | १ | ८ | ३ | २ |
| २. | अनु. जमाती | ७ | ३ | १ | ० | ० | ० | २ | १ | ० |
| ३. | विजा-अ | २ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ४. | भज-ब | ३ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ५. | भज-क | ६ | ० | १ | १ | ० | १ | २ | १ | ० |
| ६. | भज-ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ७. | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| ८. | इमाव | २५ | ९ | ४ | १ | ० | १ | ७ | २ | १ |
| ९. | खुला | ४० | ११ | ६ | २ | १ | २ | १२ | ४ | २ |
| | एकूण | १११ | ३० | १७ | ६ | २ | ६ | ३३ | ११ | ६ |
| | | टिपः-रक्षक हे पद गणवेशधारी असल्याने अपंगासाठी आरक्षण लागू नाही. | | | | | | | | |

## २. कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे ६ यांचे अधिनस्त कारागृहांकरिता

**मध्यवर्ती कारागृह**:- येरवडा, कोल्हापूर.

**जिल्हा कारागृह**:- कोल्हापूर, विसापूर, अहमदनगर, सांगली, सोलापूर, सातारा

**खुली वसाहत/ कारागृह**:- स्वतंत्रपूर खुली वसाहत, आटपाडी/ येरवडा खुले जिल्हा कारागृह

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व-साधारण | माजी सैनीक १५% | प्रकल्प-ग्रस्त ५% | भुकंप-ग्रस्त २% | खेळाडू ५% | महिला ३०% | अंश-कालीन १०% | होमगार्ड ५% |
| १. | अनु. जाती | २० | ६ | ३ | १ | ० | १ | ६ | २ | १ |
| २. | अनु. जमाती | १३ | ३ | २ | १ | ० | १ | ४ | १ | १ |
| ३. | विजा-अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | भज-ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भज-क | २ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ६. | भज-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | विमाप्र | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इमाव | १७ | ४ | ३ | १ | ० | १ | ५ | २ | १ |
| ९. | खुला | ७३ | २० | ११ | ४ | १ | ४ | २२ | ७ | ४ |
| | एकूण | १२६ | ३५ | १९ | ७ | १ | ७ | ३८ | १२ | ७ |
| | | टिपः-रक्षक हे पद गणवेशधारी असल्याने अपंगासाठी आरक्षण लागू नाही. | | | | | | | | |

## ३. कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांचे अधिनस्त कारागृहांकरिता

**मध्यवर्ती कारागृहः-** नाशिकरोड/ औरंगाबाद

**जिल्हा कारागृहः-** धुळे/ परभणी/लातूर/उस्मानाबाद/बीड/नांदेड/जळगांव

किशोर सुधारालय नाशिक, पैठण खुले कारागृह,

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व-साधारण | माजी सैनीक १५% | प्रकल्प-ग्रस्त ५% | भुकंप-ग्रस्त २% | खेळाडू ५% | महिला ३०% | अंश-कालीन १०% | होमगार्ड ५% |
| १. | अनु. जाती | १५ | ३ | २ | १ | ० | १ | ५ | २ | १ |
| २. | अनु. जमाती | ३१ | ७ | ५ | २ | १ | २ | ९ | ३ | २ |
| ३. | विजा-अ | ९ | ४ | १ | ० | ० | ० | ३ | १ | ० |
| ४. | भज-ब | ११ | २ | २ | १ | ० | १ | ३ | १ | १ |
| ५. | भज-क | ११ | २ | २ | १ | ० | १ | ३ | १ | १ |
| ६. | भज-ड | ०६ | २ | १ | ० | ० | ० | २ | १ | ० |
| ७. | विमाप्र | ६ | २ | १ | ० | ० | ० | २ | १ | ० |
| ८. | इमाव | ४२ | १२ | ६ | २ | १ | २ | १३ | ४ | २ |
| ९. | खुला | ७० | १८ | ११ | ४ | १ | ४ | २१ | ७ | ४ |
| | एकूण | २०१ | ५२ | ३१ | ११ | ३ | ११ | ६१ | २१ | ११ |
| | | टिपः-रक्षक हे पद गणवेशधारी असल्याने अपंगासाठी आरक्षण लागू नाही. | | | | | | | | |

## ४. कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांचे अधिनस्त कारागृहांकरिता

**मध्यवर्ती कारागृहः-** नागपूर/अमरावती

**जिल्हा कारागृहः-** चंद्रपूर/भंडारा/अकोला/यवतमाळ/वर्धा/बुलढाणा

**खुले कारागृहः-** मोर्शी

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व-साधारण | माजी सैनीक १५% | प्रकल्प-ग्रस्त ५% | भुकंप-ग्रस्त २% | खेळाडू ५% | महिला ३०% | अंश-कालीन १०% | होमगार्ड ५% |
| १ | अ.जा. | १६ | ०४ | ०२ | ०१ | ० | ०१ | ०५ | ०२ | ०१ |
| २ | अ.ज | ०३ | ०२ | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० |
| ३ | विजाअ | ०४ | ०२ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ० | ० |
| ४ | भज-ब | ०३ | ०२ | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० |
| ५ | भज-क | ०२ | ०१ | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० |
| ६ | भज-ड | ०२ | ०१ | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० |
| ७ | विमाप्र | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ०० | ० | ० |
| ८ | इमाव | १५ | ०५ | ०२ | ०१ | ० | ०१ | ०४ | ०१ | ०१ |
| ९ | खुला | ५७ | १५ | ०९ | ०३ | ०१ | ०३ | १७ | ०६ | ०३ |
| | एकूण | १०३ | ३३ | १४ | ०५ | ०१ | ०५ | ३१ | ९ | ०५ |
| | | टिपः-रक्षक हे पद गणवेशधारी असल्याने अपंगासाठी आरक्षण लागू नाही. | | | | | | | | |

वरील रिक्त पदांच्या संख्येत तसेच त्यानुसार सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव रिक्त पदांच्या संख्येत सामाजिक व समांतर आरक्षणातही बदल करण्याचे किंवा सदरहू भरती प्रक्रिया अंशतः किंवा पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार प्रादेशिक कारागृह उपमहानिरीक्षक हे राखून ठेवत आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | पदाची वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| २. | **लिपीक** | ५२००- २०२०० ग्रेड वेतन १९००/- | किमान माध्यमिक शालांत परीक्षा [एस.एस.सी.] अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्र मि अथवा इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्र मि या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा आणि या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण, | ----- |

## १. कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांचे अधिनस्त कारागृहांकरिता

**मध्यवर्ती कारागृहः-** मुंबई, ठाणे, तळोजा

**जिल्हा कारागृह :-** भायखळा, कल्याण, अलिबाग, सावंतवाडी, मुंबई महिला, जे जे समूह रुग्णालय कारागृह.

**विशेष कारागृहः-** रत्नागिरी.

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व-साधारण | माजी सैनीक १५% | प्रकल्प-ग्रस्त ५% | भुकंप-ग्रस्त २% | खेळाडू ५% | महिला ३०% | अपंग ३% | अंशकालीन १०% |
| १. | अ.जा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | अ.ज | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ३. | विजाअ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | भज-ब | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भज-क | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | भज-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इमाव | २ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ९. | खुला | ७ | १ | १ | १ | ० | १ | २ | ० | १ |
| | एकूण | १२ | ३ | २ | १ | ० | १ | ४ | ० | १ |

## २. कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे ६ यांचे अधिनस्त कारागृहांकरिता.

**मध्यवर्ती कारागृहः-** येरवडा, कोल्हापूर.

**जिल्हा कारागृहः-** कोल्हापूर, विसापूर, अहमदनगर, सांगली, सोलापूर, सातारा

**खुली वसाहत/ कारागृहः-** स्वतंत्रपूर खुली वसाहत, आटपाडी/ येरवडा खुले जिल्हा कारागृह

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व-साधारण | माजी सैनीक १५% | प्रकल्प-ग्रस्त ५% | भुकंप-ग्रस्त २% | खेळाडू ५% | महिला ३०% | अपंग ३% | अंशकालीन १०% |
| १. | अ.जा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | अ.ज | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | विजाअ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | भजब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भज-क | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | भज-ड | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इमाव | ३ | २ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ९. | खुला | ४ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० |
| | एकूण | ९ | ६ | १ | ० | ० | ० | २ | ० | ० |

## ३. कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांचे अधिनस्त कारागृहांकरिता.

**मध्यवर्ती कारागृहः-** नाशिकरोड/ औरंगाबाद

**जिल्हा कारागृहः-** धुळे/ परभणी/लातूर/उस्मानाबाद/बीड/नांदेड/जळगांव

किशोर सुधारालय नाशिक, पैठण खुले कारागृह,

| अ. क्र. | जात प्रवर्ग | एकूण पद संख्या | सर्व साधारण | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | महिला | अपंग | अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १५% | ५% | २% | ५% | ३०% | ३% | १०% |
| १. | अ.जा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | अ.ज | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | विजाअ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | भज ब | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भज-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | भज-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इमाव | ०२ | ०१ | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० |
| ९. | खुला | ०७ | ०३ | ०१ | ० | ० | ० | ०२ | ० | ०१ |
| | एकूण | ११ | ०६ | ०१ | ० | ० | ० | ०३ | ० | ०१ |

## ३. कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांचे अधिनस्त कारागृहांकरिता

**मध्यवर्ती कारागृह:-** नागपूर/अमरावती
**जिल्हा कारागृह:-** चंद्रपूर/भंडारा/अकोला/यवतमाळ/वर्धा/बुलढाणा
**खुले कारागृह:-** मोर्शी

| | | | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रवर्ग | एकूण पद संख्या | सर्वसाधारण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भुकपग्रस्त २% | खेळाडू ५% | महिला ३०% | अंशकालीन १०% |
| १ | अ.जा | ०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अ.ज | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | विजाअ | ०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भजब | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भज-क | ०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भज-ड | ०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | विमाप्र | ०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | इमाव | ०३ | ०२ | ० | ० | ० | ० | ०१ | ० |
| ९ | खुला | ११ | ०३ | ०२ | ०१ | ० | ०१ | ०३ | ०१ |
| | एकूण | १६ | ०७ | ०२ | ०१ | ० | ०१ | ०४ | १ |

वरील रिक्त पदांच्या संख्येत तसेच त्यानुसार सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव रिक्त पदांच्या संख्येत सामाजिक व समांतर आरक्षणातही बदल करण्याचे किंवा सदरहू भरती प्रक्रिया अंशतः किंवा पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार प्रादेशिक कारागृह उपमहानिरीक्षक हे राखून ठेवत आहेत.

### कमाल व किमान वयोमर्यादा:-

१. सर्व पदांकरिता जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक रोजीची वयोमर्यादा गणली जाईल.
२. **कारागृह शिपाई** या पदासाठी उमेदवाराचे वय किमान १८ व कमाल २५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. **लिपीक** या पदासाठी उमेदवाराचे वय किमान १८ व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय व इतर घटकांसाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या प्रचलित शासन निर्णयानुसार उच्च वयोमर्यादेत सुट देय राहिल.) मात्र आरक्षणाप्रमाणे सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे योग्य तो पुराव्यासह दाखला असणे आवश्यक.

### आरक्षण व सवलती :-

१. **महिला :-** महिला आरक्षणासाठी शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्र ८२/२००१/मसेआ-२०००/प्र क्र ४१५/का-२, दिनांक २५.५.२००१ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी व शर्तीनुसार असेल.
२. **माजी सैनिक :-** माजी सैनिकांना त्यांच्या वयामध्ये त्यांची सैन्यदलात झालेली सलग सेवा (सहा महिन्यापेक्षा कमी नाही) झाली असेल तेवढी वर्षे वजा जाता अधिक (+) तीन वर्षे इतकी सवलत देय राहील. त्याचप्रमाणे फक्त कारागृह शिपाई या पदासाठी मैदानी चाचणी व **ऑनलाईन लेखी परिक्षा** मध्ये उत्तीर्ण होण्यासाठी ५ टक्के सवलत राहिल.

उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची छायांकित /साक्षांकित प्रत कागदपत्रे पडताळणीचे वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करावी लागेल.

शासन निर्णय दि ५/१०/१९८९ नुसार **कारागृह शिपाई पदाकरिता** १५ वर्षे सैनिकी सेवा झालेले माजी सैनिक जे एस एस सी उत्तीर्ण असतील किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र धारकास सदर पदांची शैक्षणिक पात्रता शिथिल करण्यात येईल

**३. खेळाडू :-**

खेळाडू उमेदवारांकरिता दाखविण्यात आलेल्या आरक्षणासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

**अ)** खालील नमुद खेळांमध्ये आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावर भाग घेतलेला असावा. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा सहभागामध्ये शालेय स्तरावरील राष्ट्रीय स्पर्धा. सबज्युनियर नॅशनल (१७ वर्षाखालील) ज्युनियर नॅशनल (१९ वर्षाखालील) युथ नॅशनल (२१ वर्षाखालील) व सिनियर नॅशनल स्तरावरील स्पर्धांचा समावेश असेल.

**ब)** राज्यस्तरावरील क्रीडा स्पर्धेत (आंतरजिल्हा) खालील नमुद क्रीडा प्रकारामध्ये पदक प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

**क)** खेळाचे प्रकार :- आर्चरी (धर्नुविद्या) , ॲथलॅटिक्स व क्रॉस कंट्री, ॲक्वेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, बास्केट बॉल, जिम्नॅस्टिक्स, हँडबॉल, खो-खो, ज्युडो, कब्बडी, रोईंग, लॉन टेनिस, शुटींग, वेटलिफ्टींग, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, तायक्वाँडो, कुस्ती, हॉकी, बिलियडर्स् आणि स्नुकर, फुटबॉल, कराटे, पॉवर लिफ्टींग, बॉडी बिल्डींग, क्रिकेट, कॅनॉईंग आणि कयाकिंग, रग्बी. इत्यादी.

**४. गृहरक्षक दल :-** कारागृह शिपाई या पदाकरिता होमगार्डमध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा पूर्ण झालेल्या व कारागृह शिपाई या पदासाठी आवश्यक विहित वयोमर्यादा शैक्षणिक व शारिरिक पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे.

**५. प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त:-** शासन निर्णय **दि २७.८.२००९** नुसार **प्रकल्पग्रस्तासाठी ०५ टक्के** व **भूकंपग्रस्तांसाठी ०२ टक्के** समांतर आरक्षण लागु राहील.

शासन निर्णय दिनांक ०३/०२/२००७ नुसार प्रकल्पग्रस्त व भुकपग्रस्त उमेदवाराकरिता **कमाल वयोमर्यादा ४५** वर्षापर्यंत राहील.

शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकिय नोकरी मिळणेसाठी विहीत केलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचे वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## ६. अंशकालीन कर्मचारीः-

**अ)** शासन निर्णय दि २७ ऑक्टोबर २००९ नुसार **कमाल वयोमर्यादा ४६** वर्षापर्यंत राहील व १९ सप्टेंबर २०१३ अन्वये **१० टक्के समांतर आरक्षण** लागु राहतील.

**ब)** शासन निर्णय दिनांक २६/०८/२००५ व दि २७/१०/२००९ मधील तरतूदीनुसार पदविधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहीजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहीजे व **तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे**. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारास छाननीचे वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करावे लागतील.

**क)** शासन निर्णय दिनांक ३/७/२००४ नुसार अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना रोजंदारी, कार्यव्ययी, करार पध्दतीवर, मानधन इ. स्वरुपात केवळ पुर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी नियुक्तीसाठी विहीत केलेल्या अनुभवासाठी **ग्राहय धरण्यात येईल मात्र** तासिका, नियतकालिक, अशंकालिक, विद्यावेतन, अशंदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणुन नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी **ग्राहय धरला जाणार नाही**.

## ७. शासकिय सेवेतील कर्मचारी

**१.** शासकिय सेवेतील कर्मचा-यांकरिता **कमाल वयोमर्यादा ४५** वर्षापर्यंत राहील.

**२.** शासकिय/निमशासकिय सेवेत असणा-या उमेदवारांनी वरील पदांसाठी अर्ज सादर करण्यापूर्वी कार्यरत कार्यालयाची परवानगी घेणे गरजेचे आहे तसेच नियुक्ती पूर्वी त्यांनी कार्यरत कार्यालयाकडून राजीनामा किंवा कार्यमुक्त आदेश प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच परवानगी पत्राची प्रत कागदपत्रे छाननीचे वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करावी लागेल.

## परिक्षेचे स्वरुप :-

## अ) कारागृह शिपाई या पदासाठी

**शारिरीक चाचणी :- १०० गुण** जे उमेदवार शारिरीक मोजमाप पात्रतेनुसार उंची व छातीमध्ये पात्र ठरतील अशा उमेदवारांची १०० गुणांची शारिरीक/मैदानी चाचणी घेण्यात येईल. (शारिरीक/मैदानी चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे आवश्यक)

| अ.क्र | पुरुष उमेदवारासाठी | गुण |
|---|---|---|
| १ | १०० मीटर धावणे | २० |
| २ | ८०० मीटर धावणे | २० |
| ३ | १० पुलअप्स | २० |
| ४ | लांब उडी | २० |
| ५ | गोळा फेक | २० |
| | **एकुण गुण** | **१००** |

| अ.क्र | महिला उमेदवारांसाठी | गुण |
|---|---|---|
| १ | २०० मीटर. धावणे | २५ |
| २ | ३ किलो मीटर चालणे | २५ |
| ३ | लांब उडी | २५ |
| ४ | गोळा फेक (४ कि.ग्रॅ) | २५ |
| | **एकुण गुण** | **१००** |

शारिरिक चाचणीत उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

**लेखी किवा ऑनलाईन चाचणी :- १०० गुण (जे उमेदवार शारिरीक पात्रता चाचणी किमान** ५०% गुण मिळवून पुर्ण करतील त्यांचेपैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रवर्ग निहाय पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणे लेखी परिक्षेस पात्र ठरविण्यात येईल.) ऑनलाईन परिक्षेत अंक गणित , सामान्यज्ञान व चालू घडामोडी, बुध्दीमत्ता चाचणी व मराठी व्याकरण या विषयाचा समावेश असेल. (लेखी चाचणीमध्ये ५०% गुण मिळविणे आवश्यक)

## ब) लिपीक  या पदासाठी

**परिक्षेचे स्वरुप :- लिपिक या पदासाठी**

२०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल त्यामध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांचा समावेश असून प्रत्येक विषय ५० गुणांचे असतील.

- लेखी /ऑनलाईन चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व ऑनलाईन चाचणी बहुपर्यायी स्वरुपाची व मराठी भाषेत घेण्यात येईल.
- लेखी परिक्षा **ऑनलाईन** पध्दतीने घेण्यात येणार आहे.
- **ऑनलाईन** परिक्षेच्या वेळी मोबाईल फोन व इतर कोणतीही संपर्क साधने तसेच इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत ठेवता येणार नाही.

- **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार कारागृह विभागाच्या सेवाप्रवेशासाठी लहान कुटूंबाचे नमुना अ मधील प्रतिज्ञापत्र उमेदवाराने मुलाखतीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

- **मराठी भाषेचे ज्ञान:-** उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक राहील.
- **भरती परिक्षा शुल्क:**

खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु.५००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.२५०/- एवढे भरती प्रक्रिया शुल्क जाहिरातीत नमुद केलेल्या पध्दतीनुसार स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या शाखेत भरावे लागेल. माजी सैनिकांना परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. **एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही.**

**अटी व शर्ती:-**

१) **१.** कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग मुंबई, **२.** कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग पुणे, **३.** कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग औरंगाबाद, **४.** कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग नागपूर, या विभागाकरिता कारागृह शिपाई व लिपीक या पदाचे अर्ज मागविण्यात येत आहेत. **उमेदवाराने कोणताही एक विभाग निश्चित करुन फक्त एकाच विभागाकरिता अर्ज करावा.**

२) चारही विभागांकरिता शारिरीक/मैदानी व लेखी चाचणी एकाच दिवशी घेण्यात येईल.

३) शारिरीक/मैदानी चाचणी प्रादेशिक कारागृह उपमहानिरीक्षक यांचेमार्फत घेण्यात येईल.

४) निवड झालेल्या उमेदवारांची **नियुक्तीपूर्वी** जिल्हा शल्य चिकित्सक किंवा सक्षम वैद्यकिय अधिकारी यांचेकडून वैद्यकिय तपासणी करून घेण्यात येईल. वैद्यकिय तपासणीत अपात्र ठरल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

५) निवड झालेल्या उमदेवारास नियुक्तीपूर्वी त्याचे संबंधित पोलीस स्टेशाकडून स्वतःचा चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करणे बंधनकारक राहिल. चारित्र्य पडताळणीमध्ये उमेदवाराविरुध्द पोलीस गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

६) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती ही प्रादेशिक कारागृह उपमहानिरीक्षणालयाच्या अंतर्गत असलेल्या विभागातील कोणत्याही कारागृह संस्थेत करण्यात येईल, परंतु त्यांच्या सेवा महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही कारागृह संस्थेत बदलीस पात्र असतील. **तसेच लिपिक** उमेदवाराची नियुक्ती **मुख्यालयाचे स्तरावरसुध्दा** करण्यात येणार आहे.

७) कारागृह शिपाई व लिपीक या दोन्ही पदासाठी माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी/हिंदी भाषा विषयांचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परिक्षा उतीर्ण होणे आवश्यक राहिल.

८) शासन निर्णय सा प्र वि निर्णय क्र प्रशासन २०००/प्र क्र ५/२००१/३२, दिनांक २०.७.२००२ व दिनांक १९.३.२००३ नुसार कारागृह शिपाई व लिपिक या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांपैकी निवड झालेल्या उमेदवारांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचे आत सादर करणे आवश्यक राहील.

९) कारागृह शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व संबंधित परिक्षा **चार** संधीमध्ये **दोन वर्षात उत्तीर्ण व्हावे लागेल.** जर चार संधीमध्ये तो परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

१०) कारागृह शिपाई या पदासाठी कारागृह विभागातील सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवाराची दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे येथे मानसिक चाचणी घेण्यात येईल सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**११)** कारागृह शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर/ रुजू झाल्यानंतर पुढील ५ (पाच) वर्षात कारागृह शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून सेवेत आल्यापासून राजीनामा देईपर्यंतच्या कालावधीत अदा करण्यात आलेले संपूर्ण वेतन व भत्ते, प्रशिक्षण खर्च तसेच **बंधपत्रात** नमुद केलेली संपूर्ण रक्कम एकरक्कमी वसूल केली जाईल.

**१२)** उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**१३)** कारागृह शिपाई व लिपीक या पदावर निवड झालेल्या उमेदवारास अपवादात्मक परिस्थितीखेरीज सेवेत १० वर्षे पूर्ण होणेपूर्वी प्रादेशिक कारागृह विभागाबाहेरील कारागृह संस्थेत बदलीकरिता अर्ज करता येणार नाही.

**महत्वाच्या सूचना:-**

**१)** पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये. तसेच यापूर्वी कारागृह विभागात नोकरीकरिता केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**२)** परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये किंवा परिक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

**३)** नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १.११.२००५ नुसार लागू करण्यात आलेली परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल.

**४)** खेळाडू उमेदवारांसाठी राज्य/अखिल भारतीय आंतरविद्यापीठ/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांबाबत मान्यताप्राप्त क्रीडा संघटना अथवा प्राधिकरण यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची पडताळणी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालाालय, महाराष्ट्र राज्य, पुणे किंवा त्यांचे जिल्हा प्रतिनिधी यांचेकडून करुन घेण्यात येईल. व तपासणीअंती सदर प्रमाणपत्र वैध ठरल्यास पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

**५)** मूळ कागदपत्रे नियुक्तीपूर्वी तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

**६)** शारिरिक/मैदानी चाचणी तसेच लेखी अथवा ऑनलाईन परिक्षा लेखी/ ऑनलाईन परिक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर, सामाजिक/ समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

**७)** राज्य शासनाच्या कोणत्याही सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असली तरी उदा. (जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र) वरील पदासाठी विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

८) उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधीत पदाची शारिरिक व शैक्षणिक अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे अथवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे/कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

९) उमेदवारांना शारिरिक/मैदानी चाचणी तसेच लेखी अथवा ऑनलाईन परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१०) कारागृह शिपाई या पदासाठी शारिरिक/मैदानी चाचणी व लेखी अथवा ऑनलाईन परिक्षा तसेच लिपिक या पदासाठी लेखी अथवा ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेण्यात येणार असल्याने या परिक्षा संदर्भातील सर्व माहिती कारागृहाच्या www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर तसेच M K C L या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/dig या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया उमेदवारांनी वरिल संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पहावी. संबंधित परिक्षेचा निश्चित दिनांक संपल्यानंतर उमेदवार परिक्षेसाठी आल्यास त्याची कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

११) कारागृह शिपाई भरती निवड प्रक्रियेमध्ये उमेदवाराने शारिरिक /मैदानी चाचणी, ऑनलाईन चाचणी या दोन्ही परिक्षांमध्ये मिळविलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या क्रमाने शासन सा प्र वि परिपत्रक क्र एसआरव्ही-१०९७/प्र क्र ३१/९८/१६ अ, **दिनांक १६.३.१९९९** मधील तरतुदीनुसार सामाजिक व समांतर आरक्षणाची पदे भरण्यात येतील.

१२) लिपिक या पदासाठी २०० गुणांच्या लेखी/ऑनलाईन परिक्षे मध्ये उत्तीर्ण उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या क्रमाने शासन निर्णय दिनांक १६.३.१९९९ मधील तरतुदीनुसार सामाजिक व समांतर आरक्षणाची पदे भरण्यात येतील.

१३) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समांतर आरक्षण प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर समांतर आरक्षणातील पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षण विरहित म्हणून भरण्यात येतील.

**१४)** **(अ)** इ.मा.व., वि.मा.प्र., विजा-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले चालू वर्षाचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट) **अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**(ब)** इ.मा.व., वि.मा.प्र., विजा-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, आणि **खुल्या** गटातील महिलांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले चालू वर्षाचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट) **अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**१५)** अर्जात नमूद विहीत नमुन्यातील छोट्या कुटूंबाचे व अर्जातील माहिती खरी असल्याचे प्रतिज्ञापत्र मुलाखतीपूर्वी उमेदवाराने सादर करणे बंधनकारक आहे.

**१६)** मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना, महाराष्ट्र शासनाच्या सा प्र वि शा नि दि.१२.१२.२०११ नुसार आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर **सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र** सादर करणे ही संबंधीत उमेदवाराची जबाबदारी राहिल. अन्यथा सदर उमेदवाराची कारागृह विभागातील सेवा समाप्त करण्यात येईल.

**१७)** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपूर्वी खालील मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) या केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक यांचेकडून साक्षांकित करून तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. मुळ कागदपत्र तपासणीमध्ये अपात्र ठरल्यास उमेदवारांची निवड रद्द ठरविण्यात येईल.

**०१.** शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली प्रमाणपत्रे/ गुणपत्रिका.
**०२.** जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र
**०३.** वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्माचा दाखला
**०४.** विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र
**०५.** प्रकल्पग्रस्त असल्यास उमेदवाराचे नावे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र
**०६.** लहान कुटुंब असल्याचे व अर्जात भरलेली माहिती खरी असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र
**०७.** अधिवास प्रमाणपत्र
**०८.** विवाहित महिला उमेदवारांसाठी तसेच ज्या उमेदवारांचे नावात बदल झालेला आहे अशा उमेदवारांकडे नावात बदल झालेबाबत शासनाने अधिसुचित केलेले राजपत्र असणे आवश्यक आहे.
**०९.** या शिवाय उमेदवाराला जे जे लागू होते त्या त्या दाखल्यांच्या प्रती इ.

१८) जाहिरातीत दिलेली पदसंख्या कमी-जास्त / बदल होण्याची शक्यता आहे. निवड झालेल्या उमेदवारांना राज्यातील कोणत्याही कारागृह/ संस्थेत नेमणूका देण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र कारागृह विभागाचे नियम बंधनकारक राहतील. कारागृह विभागाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या पदांना आवश्यक असणा-या परिक्षा विहीत कालावधीत उत्तीर्ण होणे उमेदवारास बंधनकारक असेल व सदर पदाच्या परिक्षेकरिता कारागृह विभागाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१९) भरतीच्या नियमामध्ये भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुधारित शासन निर्णय/परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो. तसेच शासन वेळोवेळी बंधनकारक करीत असलेल्या अटी व शर्ती उमेदवारांना लागू राहतील.

२०) उमेदवारांना समान गुण मिळाल्यास, ज्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता उच्च आहे, त्यांचा गुणवत्ता क्रम प्रथम क्रमांकावर लावण्यात येईल व त्यानंतर जो उमेदवार वयाने जेष्ठ आहे, त्या उमेदवाराचा क्रम नंतर लावण्यात येईल.

## ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:-

१) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जाईल.

२) ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज http://oasis.mkcl.org/dig या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

**३) ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यन्त |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | **०६.०१.२०१४** | **२७.०१.२०१४** |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | **०७.०१.२०१४** | **२९.०१.२०१४** |
| ३ | ज्या उमेदवाराने बँकेमध्ये दिनांक **२९.०१.२०१४** पर्यन्त भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | **३१.०१.२०१४** | |

४) ऑन लाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना MKCL या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/dig या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उमेदवार MKCLयांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेऊ

शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती http://oasis.mkcl.org/dig संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

५) उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर (Webside) Apply Online) या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटनावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. केवळ नोंदणी (Registation) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही.

६) नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application Form Number) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वतःकडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावा.

७) त्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे.

८) या प्रिंट केलेल्या चलनावर नमूद केलेली फी केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI)च्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या **दुसऱ्या** दिवशी तसेच वरील तक्त्यातील वेळापत्रकात नमूद केलेल्या मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील. व त्याची एक प्रत स्वतःकडे जपून ठेवावी. अर्जाची फी भरणेसाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

९) बँकेत फी भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी उमेदवाराने आपला उर्वरित अर्ज भरावा.

१०) उर्वरित अर्ज सादर करताना उमेदवारांने स्वतःचा नवीनतम **(लेटेस्ट)** फोटो व स्वतःची स्वाक्षरी दोन्ही स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

११) उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेऊन ती स्वतःजवळ ठेवावी.

१२) वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया व उर्वरित अर्ज भरणे) प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार शारिरीक/ मैदानी/लेखी परीक्षा देण्यासाठी पात्र होईल.

१३) उमेदवारांच्या माहिती व मदतीकरीता मे. MKCLयांच्या कॉल सेंटरवरील दूरध्वनी क्रमांक **९३२६५५२५२५** वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल. कारागृहाचे ठिकाणी संपर्क करु नये.

१४) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल नंबर व ईमेल आयडी असल्यास नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

१५) शारिरीक/मैदानी/लेखी किंवा ऑनलाईन परिक्षेची तारीख कारागृह विभागाच्या www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर व **MKCL** या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/dig संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र व परिक्षास्थळ **MKCL** या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/dig या संकेतस्थळावर परिक्षेपूर्वी आठ दिवस आधी अर्ज क्रमांकानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी

त्यांचा अर्ज क्रमांक संकेतस्थळावर नमूद करुन लॉग ऑन केल्यानंतर प्रवेशपत्राची प्रिंट प्राप्त करुन घ्यावी.

१६) शारिरीक/मैदानी **/लेखी किंवा ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत.**

१७) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

१८) शारिरीक/मैदानी /लेखी **किंवा ऑनलाईन** परिक्षेतील गुणानुक्रम व आरक्षण विचारात घेऊन पात्र झालेल्या उमेदवारांची नावे कारागृह विभागाच्या www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर व MKCL या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/dig संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

१९) सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी शारिरीक/मैदानी लेखी किंवा ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेण्यात येणार असल्याने परिक्षा संदर्भातील सविस्तर माहीती http://oasis.mkcl.org/dig व www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर त्या त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया उमेदवारांनी वरील संकेत स्थळावरील माहीती वेळोवेळी पहावी.

२०) एकदा ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही, याची उमेदवाराने नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील स्वतः जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

२१) लेखी **किंवा ऑनलाईन** परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी माहीती MKCL या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/dig संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

| | | | |
|---|---|---|---|
| **स्वाक्षरीत/-**<br>**(जे एस नाईक)**<br>अध्यक्ष,<br>प्रादेशिक निवड समिती<br>(कारागृह)<br>तथा कारागृह उपमहानिरीक्षक,<br>मध्य विभाग, औरंगाबाद | **स्वाक्षरीत/-**<br>**(व्ही डी बुरकुले)**<br>अध्यक्ष,<br>प्रादेशिक निवड समिती<br>(कारागृह)<br>तथा कारागृह उपमहानिरीक्षक,<br>दक्षिण विभाग, मुंबई | **स्वाक्षरीत/-**<br>**(शशिकांत शिंदे)**<br>अध्यक्ष,<br>प्रादेशिक निवड समिती<br>(कारागृह)<br>तथा कारागृह उपमहानिरीक्षक,<br>पूर्व विभाग, नागपूर | **स्वाक्षरीत/-**<br>**(आर.टी.धामने)**<br>अध्यक्ष,<br>प्रादेशिक निवड समिती<br>(कारागृह)<br>तथा कारागृह उपमहानिरीक्षक,<br>पश्चिम विभाग, पुणे |